# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/ 10847/२०१८ दिनांक १८/१२/२०१८

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

**विषय - मराठी भाषा संवर्धन पंधरवडा (१/१/२०१९ ते १५/१/२०१९) निमित्य आयोजित विवीध स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याबाबत.**

**सदर्भ - शासन परिपत्रक दिनांक ५/१२/२०१८**

महोदय

उपरोक्त संदर्भांकित विष्यान्वाये नमूद करण्यात येते की मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन करण्यासाठी दिनांक १ जानेवारी २०१९ ते १५ जानेवारी २०१९ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला असून, त्या निमित्याने विद्यापीठ स्तरीय पुढील स्पर्धांचे आयोजन पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे करण्यात येत आहे.

| अ.क्र | दिनांक | स्पर्धा | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ३/१/२०१९ | विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा | सकाळी ११.३० |
| २ | ४/१/२०१९ | विद्यापीठ स्तरीय हस्ताक्षर स्पर्धा | सकाळी ११.३० |
| ३ | ५/१/२०१९ | विद्यापीठ स्तरीय घोषवाक्य स्पर्धा | सकाळी १०.३० |
| ४ | ८/१/२०१९ | विद्यापीठ स्तरीय वक्तृत्व स्पर्धा | सकाळी ११.३० |

सदर स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त चार (०४) विद्यार्थ्यांची नावे दिनांक २८/१२/२०१८ पर्यंत, प्रा. डॉ. अनिरुद्ध गचके (प.शै.वाणिज्य विभाग, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली) यांच्या कडे आपल्या स्वाक्षरीच्या पत्राद्वारे खालील प्रारुपात पाठवावी.

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | स्पर्धा |
|---|---|---|---|
| १ | | | |

## स्पर्धेचे नियम

विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा :
वेळ - १.३० तास
शब्दमर्यादा - १००० शब्द
माध्यम - मराठी
विषय - १. मराठी भाषा संवर्धनात साहित्यीकांचे योगदान
२. मराठी साहित्यातून व्यक्त होणारा भाषा गौरव
३. व्यावहारिक जिवनातील मराठीची उपयुक्तता
(स्पर्धकाला वरील तीन पैकी एका विषयावर निबंध लिहावा लागेल )

विद्यापीठ स्तरीय हस्ताक्षर स्पर्धा :
स्पर्धकांना एक मराठी परिच्छेद लेखनासाठी देण्यात येईल.

विद्यापीठ स्तरीय घोषवाक्य स्पर्धा :
विषय - मराठीचा गौरव करणारे व जागर करणारे स्वलिखीत घोषवाक्य
वेळ - ३० मिनिटे
माध्यम - मराठी

विद्यापीठ स्तरीय वक्तृत्व स्पर्धा :
विषय - मराठी भाषा संवर्धन वर्तमानाची गरज
वेळ - प्रत्येक स्पर्धकाला १० मिनिटे मिळतील.
वक्तृत्वाचे माध्यम मराठी असेल.

सूचना -
१. वरील सर्व स्पर्धा विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागात होतील.
२. स्पर्धकांनी ठरलेल्या वेळेच्या ३० मिनिटे पूर्वी स्पर्धास्थळी हजर रहावे.
३. प्रत्येक स्पर्धेतील प्रथम व दुसऱ्या क्रमांकाच्या विजेत्यास बक्षिस व प्रशस्तिपत्र देण्यात येईल.
४. सर्व स्पर्धांतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

मराठी साहित्यकारांच्या जीवनावर माहितीपट -
पु.ल.देशपांडे व ग.दि.माडगुळकर यांच्या जन्म शताब्दी वर्षा निमित्य त्यांच्या जीवनावरील मराठी चित्रफित आपल्या महाविद्यालयात दाखविणे.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.